



प्रकरण 5

अंधश्रद्धा निर्मूलनवाद्यांची एक फसवी भलावण



अंधश्रद्धा निर्मूलनवाद्यांची एक फसवी भलावण

अंधश्रद्धा निर्मूलनासंबंधीची प्रस्तुत लेखकाची भूमिका '**अनुराधाबाईच्या विभूतीचमत्कारामुळे अंधश्रद्धानिर्मूलनवादाची इतिश्री**' या प्रकरणात स्पष्ट केली असून **विज्ञान आणि बुद्धिवाद** या ग्रंथाच्या '**खरे विज्ञान आणि खोटे विज्ञान**' या प्रकरणात याविषयीचे भरतवाक्य त्याने म्हटले आहे. पुन्हा याविषयी काही लिहिण्याची वास्तविक इच्छा नव्हती. पण लोणावळ्याच्या 'रेस्ट न्यू वे तर्फे प्रसिद्ध



झालेल्या १९८९ च्या 'मनशक्ती'च्या दिवाळी अंकातील '**अंधश्रद्धानिर्मूलनातील गुण आणि धोके**' या लेखामुळे प्रस्तुत लेखकाला अनिच्छेने यासंबंधी पुन्हा थोडे लिहावे लागत आहे. (असा लेख दुसरा कोणी लिहिला असता तर त्याची त्माने दरवल घेतली नसती. पण ज्याने एकेकाळी अंधश्रद्धानिर्मूलनवाद्यांचा खोटारडेपणा जाहीरपणे वेशीवर टांगला होता, त्या 'रेस्ट न्यू वे'ने असा लेख लिहावा, हे त्याला खटकले. म्हणून हा लेखन प्रपंच करावा लागत आहे.)

उपर्युक्त अंकात अंधश्रद्धा निर्मूलनवाद्यांमध्ये चार गुण असल्याचे म्हटले आहे. आणि बहुतेक हे गुण विचारात घेऊनच पान २७७ वर पुढील विधाने केलेली आहेत, अंधश्रद्धेविरुद्ध लढाई लढताना, त्यातील काहीजण [1]अतिरेक करीत असतील.... टोकाची भूमिका घेत असतील. प्रसंगी त्या सोसूनही त्यांना साथ दिली पाहिजे. चांगल्या गोष्टीमध्ये आव्हानापेक्षा आवाहनाची गरज आहे." आता या संदर्भात काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. **पहिला प्रश्न** असा, की अंधश्रद्धानिर्मूलन ही चांगली गोष्ट नाही असे म्हणणारा एक तरी विचारवंत कोठे सापडतो का? मग त्यांना साथ का मिळत नाही साथ द्या असे सांगण्याची गरज का निर्माण होते याचा विचार करावयास

1

१. अतिरेक याचा अर्थ एखाद्या गोष्टीचा अति आग्रह धरणे असा होत असला, तरी सत्याचा आग्रह कितीही धरला तरी तो अतिरेक होत नाही. उलट असत्याचा आग्रह फालतु गोष्टीसाठी थोडा जरी धरला तरी तो अतिरेक होतो. उदा. जननशास्त्राच्या अभ्यासामुळे नाझीवाद (हिटलरशाही) जन्माला येईल म्हणून ते शास्त्र शिकवू नये असा आग्रह जर कोणी धरू लागला तर तो शास्त्रीय दृष्ट्या अतिरेक ठरतो. अतिरेक म्हणजे खऱ्या अर्थाने मर्यादोल्लंघन होय.

२. 'मनशक्ती'चे प्रकाशक, रेस्ट न्यू वे आश्रम व केंद्र, मुंबई-पुणे रस्ता, लोणावळा, याचे कार्यकारी विश्वस्त श्री. प्र. सी. शिंदे यांनी १४.१.१९९४ रोजी लेखकाला पत्राने अक्षरे मूळ लेखकाची) यातील पहिल्या दोन गुणांबद्दल मला काही म्हणावयाचेनाही. शेवटचे दोन गुण लेखकाला मार्टिन गार्डनरच्या 'सायन्स गुड, बॅड अँड बोगस' या पुस्तकामुळे अं. श्र. नि. वाद्यांमध्ये दिसले आहेत. (मार्टिन गार्डनर म्हणजे महाराष्ट्रातील अं. श्र. नि. वादी नव्हेत, हा विचार तूर्त बाजूला ठेवू व त्यांच्यात हे गुण आहेत असे लेखकाला वाटते असे समजू.)

नको काय? **दुसरा - प्रश्न** असा, की आव्हानापेक्षा आवाहनाची गरज आहे या सल्ल्याची वास्तविक कोणाला गरज आहे? आव्हाने कोण देत असतात? अनुराधाबाईंच्या विभूती चमत्काराची व्यक्तिशःखात्री करून घेण्याचे लेखी आवाहन खास दूताकरवी स्वतःअनुराधाबाईंनी दिले असता ते झिडकारून वृत्तपत्रातून (पोकळ) आव्हान कोणी दिले? पण सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा, की अंधश्रद्धा निर्मूलन हे समाजकार्य असताना त्यात अतिरेक कसा संभवतो? ('समाजकार्याचा अतिरेक' ही कल्पनाच करता येत नाही.) उपर्युक्त लेखात या गोष्टींची चर्चा न करता इतर बरेच काही लिहिले आहे, आणि मुख्य प्रश्नाला बगल देण्यात आली आहे. मुख्य प्रश्न असा आहे, की ज्या विज्ञानाच्या नावाखाली ही चळवळ सुरू आहे त्या विज्ञानाची दृष्टी ही चळवळ करणाऱ्या लोकांत आहे काय? खरे तर वैज्ञानिक दृष्टी असेल तर अतिरेकाचा प्रश्नच उपस्थित होत नाही; आणि वादही निर्माण होत नाही. विज्ञानाच्या नावाखाली टोकाची भूमिका घेणेच शक्य नाही. विज्ञानाच्या कसोट्या सार्वजनिक, वस्तुनिष्ठ आणि वादातीत असतात. त्या ठिकाणी 'अतिरेक' आणि 'टोकाची भूमिका' संभवतच नाहीत. अतिरेक होतो तो अवैज्ञानिक दृष्टिकोन बाळगल्यामुळे (फालतू गोष्टींचा विचार केल्यामुळे) होय. आणि अं. श्र. नि. वाद्यांकडून अतिरेक होतो याचे कारण त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव आहे हेच आहे. म्हणून प्रस्तुत लेखकाचा प्रश्न आहे की, अं. श्र. नि. वाद्यांच्या (या अवैज्ञानिक दृष्टिकोनामुळे निर्माण झालेल्या) अतिरेकाचे उपर्युक्त लेखक कसे समर्थन करतो ? आणि त्यांना त्यामध्ये साथ देण्याचा इतरांना कसा सल्ला देतो?"[2] अंधश्रद्धा निर्मूलनवाद्यामध्ये पुढील चार गुण असल्याचे लेखकाने म्हटले आहे - (लेख निनावी असल्यामुळे 'लेखक' असाच उल्लेख करीत आहे.) [3]' **(१) निस्स्वार्थपणा, (२) त्याग (३) अभ्यासूपणा, (४) मोकळेपणा (ठळक**

---

[2] कळविले की हा लेख केंद्राचे संस्थापक स्वामी विज्ञानानंद यांनी लिहिला आहे. स्वामी माझे लेख अगत्यपूर्वक वाचतात असेही त्यांनी कळविलेले आहे. हा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्याच दिवसात ११८ नोव्हें., १९९३ रोजी) त्यांनी आत्महत्या केली हे खेदाने नमूद करावे लागते.

[3]

'मनशक्ती' च्या पृष्ठ २६८ वर लेखक म्हणतो, “**गार्डनर 'सायन्स : गुड, बॅड अँड बोगस'** या पुस्तकाच्या प्रस्तावनेपैकी (रोमन) सोळा या पानावर परिच्छेद तीनमध्ये म्हणतो की, अंधश्रद्धावाल्यांविरुद्ध कायदा करण्याचा आग्रह मी धरणार नाही. त्या खालच्या परिच्छेदात तो म्हणतो, की गूढवादी साहित्य प्रचंड प्रमाणात खपते. तरीसुद्धा मी अशा कायद्याविरुद्ध राहीन की जो प्रकाशक, चित्रपट अथवा टी. व्ही. निर्माते यांच्यावर बंधने घालील. गार्डनरच्या मनाचा हा मोकळेपणा कौतुकास्पद आहे. जगात आज अंधश्रद्धेविरुद्ध गार्डनरपेक्षा जिद्दीने ४० वर्षे कोण लढत आहे?"

आता येथे बऱ्याच चुकीच्या गोष्टी सांगितल्या आहेत. पहिली गोष्ट, उपर्युक्त पुस्तकातील प्रस्तावनेच्या (रोमन) सोळा या पानावर गार्डनरने असे काहीच म्हटलेले नाही. दुसरी गोष्ट, रोमन चौदा पानावर परिच्छेद तीनमध्ये जे म्हटले आहे, ते लेखक म्हणतो त्याच्या थेट उलट अर्थाने म्हटले आहे. आणि तिसरी गोष्ट, त्याच्या खालील परिच्छेदात लेखक म्हणतो तसे गार्डनरने मुळीच म्हटलेले नाही. कोणाला वाटेल की माझे पुस्तक लेखकाच्या पुस्तकाहून वेगळे असेल. पण तसे मुळीच नाही. 'सायन्स : गुड, बॅड अँड बोगस' या पुस्तकाचा पान ८७ वरचा गार्डनरने आपल्यामध्ये 'नॅशनल प्रेज्युडाइस' (बुद्धिवादी पूर्वग्रह) असल्याचे कबूल केल्याचा लेखकाने जो संदर्भ दिला आहे तो बरोबर आहे. त्यावरून माझे संदर्भ पुस्तक व लेखकाचे संदर्भ पुस्तक एकच आहे हे सिद्ध होते.

गार्डनरच्या ज्या विधानाच्या आधारे लेखक गार्डनरची भलावण करतो, ते पान चौदावरील (सोळावरील नव्हे) विधान असे आहे Although I am opposed to any kind of law that tells a publisher or movie or T.V. producer what cannot be done, I reserve the right of moral indignation both as an individual and as a member of a pressure group.'

याचा अर्थ असा, की गार्डनर म्हणतो की, प्रकाशक किंवा चित्रपट वा टी. व्ही. निर्माते यांनी काय करू नये, हे सांगणाऱ्या कायद्याविरुद्ध मी असलो तरी व्यक्ती या

नात्याने आणि दबाव आणणाऱ्या संघटनेचा सभासद म्हणून माझा नैतिक संताप व्यक्त करण्याचा हक्क मी राखून ठेवतो. यात गौण वाक्य कोणते व मुख्य वाक्य कोणते हे लक्षात घेतले, तर गार्डनरचा मुख्य रोख अंधश्रद्धा कायद्याविरुद्ध आपण आहोत हे सांगण्याकडे नसून अंधश्रद्धेविरुद्ध संताप व्यक्त करण्याचा आपल्याला हक्क आहे हे बजावण्याकडे आहे हे लक्षात येईल. पण प्रश्न असा आहे, की अंधश्रद्धेचे समर्थन कोणीच करीत नसल्यामुळे त्याविरुद्ध संताप व्यक्त करण्याचा प्रश्न कोठे उद्भवतो? पण गार्डनरच्या दृष्टीने तो उद्भवतो ! आणि याचे कारण त्याचा पूर्वग्रह 'सत्य' काय आहे, हे त्याने अगोदरच (वैज्ञानिक संशोधनापूर्वीच ठरविले आहे आणि हा पूर्वग्रह आपल्यात असल्याचे त्याने स्वतःच मान्य केले आहे ! (पाहा पृष्ठ ८७) अशा रीतीने वरील वाक्यात गार्डनरच्या मनाचा मोकळेपणा नसून स्वतःच्या (बुद्धिवादी) पूर्वग्रहाचे (आंधळे) समर्थन करण्याच्या हक्काचे प्रतिपादन आहे. आपला संताप व्यक्त करून हा पूर्वग्रह विज्ञानाच्या नावाखाली खपविण्याचा व सामूहिक दबाव (Pressure group) आणून तो समाजावर लादण्याचा आपणाला हक्क आहे असे सुचविणारे प्रतिपादन तो या वाक्यात करतो. पण हे असमर्थनीय आहे. खरे तर अशा पूर्वग्रहाच्या समर्थनासाठी नव्हे, तर अशा समर्थनाविरुद्ध संताप व्यक्त करण्याचा हक्क समर्थनीय आहे. **कारण पूर्वग्रहाचे समर्थन वैज्ञानिक दृष्ट्या करणेच अशक्य आहे.** आणि म्हणून अशा पूर्वग्रहाच्या समर्थनार्थ (इतराविरुद्ध) संताप व्यक्त करण्याचा हक्क स्वतःला वैज्ञानिक म्हणवून घेणाऱ्या गार्डनरला मुळीच पोचत नाही. तरी तो हक्क आपण स्वतःसाठी राखून ठेवतो, असे गार्डनर म्हणतो. अशा रीतीने गार्डनरचा 'मोकळेपणा' लेखक म्हणतो तसा इतरांसाठी किंवा सत्य आपण समजतो - त्याच्या थेट उलट असू शकते, हे मान्य करण्यामध्ये नसून स्वतःसाठी आपण - म्हणतो तेच सत्य होय, हे प्रतिपादण्यासाठी आहे.

हे झाले लेखक ज्याची भलावण करतो त्या गार्डनरच्या 'मोकळेपणा'बद्दल. आता त्यांच्यातील 'अभ्यासूपणा'बद्दल बोलायचे तर लेखकाने अंधश्रद्धा

निर्मूलनवाद्यामध्ये जे दोन दोष आहेत असे म्हटले आहे, त्यांचा विचार केला तर त्यांच्यातील 'अभ्यासूपणा'वरही आपोआपच प्रकाश पडतो ! जे दोन दोष लेखकाला अं. श्र. नि. वाद्यांमध्ये दिसले आहेत ते असे "पहिली (लेखकाला अं. श्र. नि. - वाद्यांमधील खटकणारी गोष्ट) अशी की हे कार्य करणाच्या बहुतांश संस्था किंवा व्यक्ती सर्वसाधारण पातळीवर अभ्यासू असले तरी विज्ञानाच्या मूलभूत सिद्धांतापर्यंत पोचत नाहीत. आणि दुसरी गोष्ट यांच्या सिद्धांताविरुद्ध जर काही उदाहरणे सापडली तर त्यांच्यावर अप्रामाणिकपणाचा आरोप ते करतात किंवा वैयक्तिक पातळीवरही काहीजण येऊन बसतात." 'अभ्यासूपणा' सर्वसाधारण पातळीवर वेगळा व विशेष पातळीवर वेगळा.


हा या लेखकाने जो अभ्यासूपणात भेद केला आहे तो कशासाठी हे त्याचे त्यालाच माहीत. अभ्यास हा सत्य आणण्यासाठी असतो हे मान्य असेल तर असा भेद करण्याचे काहीच कारण नाही हे स्पष्ट आहे. मूलभूत सिद्धांतापर्यंत जे लोक पोचत नाहीत ते 'अभ्यासू' कसले? आणि ते कशाचा 'अभ्यास' करतात? हा प्रश्न कोणालाही सुचेल. दुसरे म्हणजे वैयक्तिक टीकेच्या पातळीवर उतरून अप्रामाणिकपणाचा जे लोक दुसऱ्यावर आरोप करायला मागे पुढे पाहत नाहीत, त्या लोकांच्या 'मोकळेपणा', 'नि:स्वार्थीपणा', 'त्याग' इ. गुणांना काय अर्थ आहे? किंवा त्यांचा काय उपयोग आहे? सत्य हे व्यक्तिनिरपेक्ष असते. तेव्हा वैयक्तिक पातळीवर न उतरता कोणत्याही गोष्टीच्या सत्यासत्यतेची तपासणी करता येते व याविषयी निष्कर्ष काढता येतो. पण हे लोक वैयक्तिक टीका करतात या वस्तुस्थितीवरून त्यांना सत्य शोधावयाचे नाही, हे अप्रत्यक्षपणे सिद्ध होते. हे जे दोन दोष अं. श्र. नि. वाद्यांचे म्हणून लेखकाने सांगितले आहेत, ते दोन दोष त्यांचे चार गुण (ते त्यांच्यात आहेत असे समजले तरी) निष्फळ ठरवितातच, पण हे लोक अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य विज्ञानाच्या नावाखाली करण्यास पूर्णपणे अपात्र आहेत हेही सिद्ध करतात. या दोन दोषांमुळे अं. श्र. नि. चळवळीची भूमिकाच तात्त्विक दृष्ट्या बिनबुडाची आहे हे सिद्ध

होते. बिनबुडाच्या म्हणजे सत्यशोधन हे उद्दिष्ट नसलेल्या, किंबहुना असत्यप्रचार हेच उद्दिष्ट असलेल्या या चळवळीच्या कार्यकर्त्यांमध्ये चार नव्हे, शंभर गुण असूनही त्यांचा काही उपयोग नाही हे कोणालाही न सांगता कळण्यासारखे आहे. असली चळवळ विज्ञानाच्या नावाखाली तरी कोणी करू नये असेच कोणीही म्हणेल. (कारण विज्ञानाचे उद्दिष्ट सत्यशोधन आहे.) अशा लोकांच्या गुणांची भलावण विज्ञान क्षेत्रात तरी असमर्थनीय ठरते. एखाद्या विवाहित पुरुषांमध्ये नवऱ्याच्या ठिकाणी जो मुख्य गुण असावयास पाहिजे तो नसेल उदा. तो पत्नीशी संबंध न ठेवता बाहेरख्याली असेल तर त्याच्यात - इतर शंभर गुण असून काय उपयोग? अशा पुरुषाची 'नवरा' म्हणून कोणी भलावण करील काय? पण 'मनशक्ती' चा लेखक नेमके हेच करीत आहे! इतकेच नव्हे, तर त्यांच्या या (बदफैली) 'गुणा'च्या अतिरेकाचे समर्थन करीत आहे! नव्हे, त्याचे हे अतिरेकी वर्तन प्रसंगी सोसून त्याला साथ देण्याचा सर्वांना सल्ला देत आहे ! याच्याही पुढे जाऊन असली 'नवरे शाही ४० वर्षे गाजवल्याबद्दल गार्डनरचे कौतुक करीत आहे ! अशा विचारवंतांपासून परमेश्वरच विज्ञानवादी समाजाचे रक्षण करील! दुसरे काय ?

टीप : (१) अतिश्रद्धाळूपणाविरुद्ध (परामानसशास्त्राच्या प्रयोगातील दोष दाखवून त्या क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना योग्य मार्गावर ठेवण्याचे) बहुमोल कार्य गार्डनरसारखे टीकाकार करत असतील, तर त्यांची समाजाला नि:संशय गरज आहे. पण ४० वर्षे गांधारीप्रमाणे स्वतःहोऊन डोळ्यांवर पट्टी बांधून घेऊन सत्य न पाहण्याचे बुद्धिवादी व्रत स्वीकारलेल्या गार्डनरसारख्या लोकांची अंधश्रद्धा ही सामान्य लोकांच्या अंधश्रद्धेहून जास्त भयानक आहे, हे स्पष्ट केले पाहिजे. कारण ती दुरुस्तीच्या पलीकडची आहे. ती अंधश्रद्धा नाही, तर भोंदूगिरी आहे. (गार्डनर आणि त्याचे अमेरिकन सहकारी यांच्या या वैज्ञानिक भोंदूगिरीवर साधार प्रकाश '**विज्ञान आणि बुद्धिवाद**' या ग्रंथातील 'खरे विज्ञान आणि खोटे विज्ञान' या प्रकरणात लेखकाने पाडला असून जिज्ञासूंनी ते प्रकरण अवश्य पाहावे.)

तसेच, गार्डनर याने मिलान रिझल या प्रसिद्ध अतींद्रिय संशोधकाला आपल्या अतींद्रिय संशोधनात फसवणूक असल्याबद्दल लेख लिहिण्यासाठी पैशाचे आणि प्रसिद्धीचे कसे प्रलोभन दाखवले, ही गोष्ट रिझलने 'जर्नल ऑफ पॅरा-सायकॉलॉजी'च्या सप्टें. १९९० च्या अंकात सांगितली आहे. यावरून गार्डनर हा भोंदूगिरीचा किती भोक्ता आहे हे कळून येते.

(२) गार्डनर आपल्यात बुद्धिवादी पूर्वग्रह (rational prejudice) असल्याचे कबूल करतो. पण बुद्धिवादी (वा सुबुद्ध) पूर्वग्रह हा शब्दप्रयोग वदतोव्याघाती आहे. सत्य खुलेपणाने स्वीकारणे हे सुबुद्धपणाचे बुद्धिवादाचे खरे लक्षण - आहे. अमुक गोष्ट सत्य होय असे अगोदरच खुल्या वातावरणात तसे प्रस्थापित - होण्यापूर्वीच गृहीत धरणे हा निर्बुद्धपणा आहे. आणि म्हणूनच गार्डनरने यापूर्वीच्या एका पुस्तकात (उदा. Fads and Fallacies) आपल्यात निर्बुद्ध पूर्वग्रह (irrational prejudice) असल्याचे प्रांजळपणे मान्य केले आहे. पण नंतर ('सायन्स : गुड, बॅड अँड बोगस' या ग्रंथात) त्यात 'सुबुद्ध' (rational) अशी दुरुस्ती केली आहे. पण ती समर्थनीय नाही. कारण पूर्वग्रह हा नेहमीच निर्बुद्ध असतो. सुबुद्ध माणूस पूर्वग्रहदूषित दृष्टी कधीच बाळगत नाही. पण दुर्दैवाने पूर्वग्रहदूषित दृष्टी बाळगणाऱ्या (अवैज्ञानिक) प्रवृत्तीलाच हल्ली बुद्धिवाद हे गोंडस नाव प्राप्त झाले आहे !


मनशक्ती
Mind Gym®
(मनसामर्थ्य विज्ञान केंद्र)
Experience Centre focusing on Education, Health and Well-being of Society
Mind Gym

समाप्त